# भारतीय ज्ञान प्रणालीच्या प्रचार आणि प्रसारा साठी ग्रंथालय एक केंद्र



| | |
|---|---|
| **श्री निशांत अ. जोशी,**<br>ग्रंथपाल,<br>श्री ह. व्या. प्र. मंडळ, डि. सि. पी. ई., स्वायत्त महाविद्यालय, अमरावती<br>Email - nishantjoshi815@gmail.com | **डॉ. मिलिंद बा. अनासाने,**<br>ग्रंथपाल,<br>श्री ह.व्या.प्र.मंडळ,<br>अभियांत्रीकी व तांत्रीकी महाविद्यालय,अमरावती<br>Email – mbanasane@rediffmail.com |



---


***सारांश :***

*भारतीय ज्ञान प्रणालीच्या निर्मिती, संवर्धन आणि जतनामध्ये ग्रंथालयांनी बजावलेल्या महत्वाच्या भूमिका या निबंधात तपासल्या आहेत. ग्रंथालये जुन्या लेखन आणि माहितीचे भंडार म्हणुन कशी कामे करता, संशोधन कार्यास कश्याप्रकारे प्रोत्साहन देतात आणि शैक्षणिक प्रयत्नांमध्ये कशी मदत करतात यावर भर दिला आहे आणि डिजिटल युगात त्यांचे स्थान मजबुत करण्याचे मार्ग सुचविले आहेत. भारताचा बौध्दिक वारसा जपण्यात आणि आधुनिक काळात त्याच्या चालू वाढीला चालना देण्यात ग्रंथालयांची महत्वाची भुमिका अधोरेखित करण्यात आली आहे.*


**किवर्डस :** भारतीय ज्ञान प्रणाली, प्राचिन ज्ञान, ग्रंथालय, ज्ञान जतन, डिजिटल युग, बौध्दिक वारसा.

---

**प्रस्तावना :**

भारतीय ज्ञान प्रणाली मध्ये विविध विषयांचा समावेश विविध ग्रंथानमध्ये आढळुण आलेला आहे. जसे की तत्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, कला व क्रिडा आणि आणखी यांसारख्या अनेक विषयांचा समावेश आपल्याला दिसुन येईल परंतु हे सर्व ग्रंथ किंवा तत्सम साहित्य टिकवुन ठेवण्याचे काम ग्रंथालया कडुनच केले जाते असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. आजच्या काळात ग्रंथालया मध्ये पारंपारीक आणि आधुनिक माहितीच्या वाढी साठी आणि वितरण सुलभ करण्या साठी नविन तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणत करण्यात येत आहे.

भारतातील ग्रंथालयामध्ये भविष्यात येणा–या पिढयांना हस्तांतरीत करण्या साठी आजही संकृत, पाली, तमीळ किंवा इतर भाषांमध्ये लिहिलेले ग्रंथ,हस्तलिखिते उपलब्ध आहेत व या करीता राष्ट्रीय ग्रंथालय, एशियाटीक सोसायटी ग्रंथालय व विविध विद्यापिठांमधिल ग्रंथालये यांनी ती मोठया कष्टाणे गोळा केलेली आहे. सोबतच त्यांच्या याद्या तयार करुन त्यांचे डिजिटल पध्दतीने जतन सुध्दा केले आहे. प्राचिन ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानातील दरी भरुन काढण्यासाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रष यांनी हजारो हस्तलिखितांचे डिजिटलाझेशन करुन ती ऑनलाइन उपलब्ध सुध्दा करुन दिली आहेत.

भारतीय ज्ञान प्रणालीच्या प्रचारा मध्ये सुध्दा ग्रंथालयाचे मोठे योगदान आहे कारण दुर्मिळ साहित्याच्या जतना सोबतच ग्रंथालया मार्फत आधुनिक परिस्थितीतही ऐतिहासिक ज्ञानाच्या वापरावर भर देण्यासाठी ग्रंथप्रदर्शनी, चर्चासत्रे, कार्यशाळा विविध आंतरराष्ट्रिय, राष्ट्रिय व स्थानीक संस्थाना सोबत घेवुन ग्रंथालया कडुन आयोजीत केली जातात आणि या उपक्रमांच्या माध्यमातून ती वाचकांन पर्यंत होचवण्याचा प्रयत्न करतात. याचे उदाहरण म्हणजे भांडारकर ओरिएंअल रिसर्च संस्था प्राचीन भारतीयपत्रे आणि भारतीय भाषांवर कार्यशाळा आयोजित करुन ऐतिहासिक साहित्याशी विव्दत्तापूर्ण संवाद साधण्यास प्रोत्साहन देते. ग्रंथालये भारतीय ज्ञान प्रणाली सोबतच समकालीन विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यातील संबंधांचे परिक्षण करण्यास सक्षम करणारी विस्तृत संसाधने प्रदान करुन, आंतरविद्याशाखीय अभ्यासाला प्रोत्साहन देतात. भारत सरकारच्या पुढाकाराने राष्ट्रीय हस्तलिखितांसाठी च्या अभियानाव्दारे ते सिध्द होते, ज्यामुळे हस्तलिखितांच्या अभ्यासासाठी आणि दुर्मिळग्रंथ निर्मितिला प्रोत्साहन मिळते, म्हणूनच पारंपारिक ज्ञानाची प्रगती होते (नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्टस,२०२३).

थोडक्यात म्हणावयाचे झाल्यास, ग्रंथालये ही भारतीय ज्ञान प्रणालीच्या वाढीला पाठिंबा देणारी आणि प्रोत्साहन देणारी आवश्यक इमारत आहे. ज्यामुळे भारतात आणि जगभरात पारंपारिक ज्ञानाचे आकलन वाढविण्यासाठी ग्रंथालये ही ज्ञानाचे रक्षक म्हणुन काम करतात. भूतकाळ आणि वर्तमान यांच्यातील दुवा म्हणून आपल्या सामाजिक व सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य भारतिय ज्ञान प्रणाली व्दारे केले जाते. भरतीय ज्ञान प्रणाली मुळे जागतिक ज्ञानात खूप प्रगती झालेली आहे आणि भारतामध्ये सांस्कृतिक व सामाजिक वातावरणाच्या निर्मितीमध्येही मोठी भर पडली आहे. ग्रंथालयाव्दारे पारंपारिक आणि समकालीन ज्ञानसाहित्याच्या भांडाराचे जतन, संवर्धन, प्रचार व प्रसारा या करीता प्रयत्न झाले आहेत व सुरुसुध्दा आहेत. या व्यतिरिक्त ग्रंथालये शैक्षणिकसंस्थां सोबत भारतीय ज्ञान प्रणालीचा अभ्यासक्रमांमध्ये एकत्रीकरण करण्याकरिता पण काम करतात. ज्यामुळे विद्यार्थ्यांना पारंपारिक ज्ञान प्रणालीं वर टिकात्मक आणि सृजनशिलपणे संवाद साधण्याची प्रेरणा मीळते. विद्यार्थी भारतीय ज्ञान प्रणाली ची ऐतिहासिक पार्श्वभुमी समजुन घेवु शकतात आणि या एकात्मते मुळे वर्तमान समस्यांना पुढे जाण्याबाबत विचारकरु शकतात, त्यामुळे त्यांना विषयाचे व्यापक आकलन होते.

**भारतीय ज्ञान प्रणाली मधील ज्ञानाचे स्त्रोत :**

- हस्तलिखिते
- तम्रपत्रे
- झाडाच्या साली वरील हस्तलिखिते
- पानांवरिल हस्तलिखिते, इत्यादी.

**ज्ञान स्त्रोतांच्या जतना सोबत त्यांच्या प्रचार व प्रसारा मध्ये ग्रंथालयांची भुमिका :**

**१. हस्तलिखितांचे जतन :**

भारतातील अनेक प्राचिन ग्रंथालयांन मध्ये कागदावर, झाडांच्या सालींवर आणि झाडांच्या पानांवर लिहिलेल्या जुन्या हस्तलिखितांचा मोठा संग्रह आहे. संशोध आणि तज्ञ या लेखांच्या माध्यमातुन खुप काही शिकू शकतात. प्राचिन हस्तलिखिते जतन करुण दुर्मिळ हस्तलिखिते ग्रंथालयांमध्ये ठेवली जातात. तसेच हस्तलिखिते आणि दुर्मिळ पुस्तकांचे डिजिटायझेशन करणे आणि मागणीनुसार अभ्यासकांना हे ज्ञान साहित्य ऑनलाइन प्रदान केले जाते.

**२. डिजिटलायझेशन व संग्रह :**

आजच्या डिजिटल युगात ज्ञान साठविण्याची आणि उपलब्ध करण्याच्या पध्दती मध्ये लक्षणीयरित्या बदल आलेला आहे. जतन करणे आणी उपलब्धता वाढविणे. या क्षेत्रसतरन एक उल्लेखनिय प्रकल्प म्हणजे ईंराष्ट्रियहस्तलिखित अभियार्न ज्या व्दारे संपूर्ण भारतातील हस्तलिखिते स्कॅन आणि जतन करण्याचा प्रयत्न केल्या जातो. जसे की डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया उपक्रमाव्दारे हजारो मजकुर डिजिटल केले गेले आहेत आणि आता ते जगभरातील वाचकांसाठी ऑनलाइन उपलब्ध आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन माहितीची पुनर्प्राप्ती आणि शोध क्षमता वाढवुन ग्रंथालयांनी शैक्षणिक संस्थांसोबत काम करून लोकांना सामग्री उपलब्ध करून देण्यासाठी ऑनलाइन रिपॉझिटरीज तयार केल्या आहेत.

**३. संशोधन सुलभ करणे :**

ग्रंथालये संशोधकांना त्यांच्या संशोधना करीता आवश्यक संसाधने मिळवण्यास मदत करतात अनेक ग्रंथालयांमध्ये विविध विषयांवर विस्तृत संग्रह उपलब्ध आहेत. ही संसाधने संशोधकांना सखोल अभ्यासाकरिता मदत करतात.

४. **कार्यशाळा, ग्रंथप्रर्दशनी व चर्चासत्रांचे आयोजन :**

ग्रंथालया मार्फत आधुनिक परिस्थितीतही ऐतिहासिक ज्ञानाच्या वापरावर भर देण्यासाठी ग्रंथप्रर्दशनी, चर्चासत्रे, कार्यशाळा विविध आंतरराष्ट्रिय, राष्ट्रिय व स्थानीक संस्थाना सोबत घेवुन ग्रंथालया कडुन आयोजीत केली जातात. अश्याप्रकारच्या आयोजना मुळे संशोधक, व्यावसायीक व विद्यार्थ्यांना एकत्र आणुन सहकार्य व माहितीची देवाणधेवाण करण्यास मदत होते. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करुन हस्तलिखिते, पारंपारिक भारतीय ज्ञान आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी आणि अभ्यासण्यासाठी आधुनिक डिजिटल तंत्रज्ञाना व्दारे ऐतिहासिक ज्ञानाच्या वापरावर भर देण्यासाठी ग्रंथप्रर्दशनी, चर्चासत्रे, कार्यशाळा विविध आंतरराष्ट्रिय, राष्ट्रिय व स्थानीक संस्थाना सोबत घेवुन ग्रंथालया कडुन आयोजीत केली जातात .

५. **आधुनिक आणि पारंपारिक ज्ञानाचे एकत्रीकरण :**

परंपारिक ज्ञान आणि समकालीन वैज्ञानिक संशोधन यांच्या मध्ये दुवा साधता यावा म्हणुन ग्रंथालये आवश्यक आहेत. ग्रंथालया कडुन संशोधकांना जुन्या आणि नविन वैज्ञानिक साहित्यीक ग्रंथांची उपलब्धता होते व बहुविद्याशाखिय अभ्यासाला चालना मिळते. त्यामुळे नविन कल्पना तसेच नविन ज्ञानाची उत्पत्ती होवु शकते.

**६. संशोधन आणि शिक्षणाला सहकार्य :**

ग्रंथालयांव्दारे भारतीय ज्ञान प्रणालीचे मुल्य आणि उपयुक्तता विद्यार्थ्यांना समजण्यास मदत होते. शैक्षणिक कार्यक्रम साहित्यांनमुळे तरुणांच्या मनात पारंपारिक ज्ञानाबद्दल आदन निर्माण होतो व अधिकाधिक माहिती जाणुन घेण्याकरिता ते संशोधना कडे वळतात आणि ग्रंथालये त्यांचे संग्रह सुलभ ठेवून वाचकांना मदत करतात आणि ग्रंथालय भारतीय ज्ञान प्रणाली संग्रहाचा मागोवा घेवुन वर्गीकरण व तालिकीकरण व्दारे त्यांचे आयोजन करतात.

७. **ज्ञानस्त्रोतांचा प्रचार व प्रसारा :**

ग्रंथालयांमध्ये नियमित आयोजित होणारे ग्रंथप्रर्दशनी, चर्चासत्रे, कार्यशाळा यांच्या मुळे भारताच्या गौरवशाली साहित्यिक भूतकाळाचे दर्शन होते व हे सर्व दुर्मिळ साहित्य वाचकांन पर्यंत पोहचण्यास मदत होते. पारंपारिक ज्ञानाबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी, ग्रंथालयांनी विस्तार सेवेसारखे उपक्रम हाती घेवुन  सेमिनार, व्याख्याने आणि कार्यशाळा आयोजित करतात.

८. **ग्रंथपाल प्रशिक्षण** :

ग्रंथपालांच्या विविध आंतरराष्ट्रिय, राष्ट्रिय व स्थानीक संघटनांच्या माध्यमातुन ग्रंथपालांना प्रशिक्षित करण्या साठी सतत चर्चासत्रे, कार्यशाळा इत्यादिंचे आयोजन करण्यात येत असते त्या मुळेच ग्रंथालय चालवितांना येणा—या आव्हानांना पुढे जाण्या करिता ग्रंथपालांना वेळोवेळी मार्गदर्शन होत असते आणि म्हणुनच ग्रंथपाल संघटनांचा सुध्दा यामध्ये मोठा सहभाग दिसुन येतो.

**९. ई—लर्निंग आणि मोबाईल ॲप्लिकेशन्स :**

पारंपारिक डेटाबेस सहज उपलब्ध व्हावेत यासाठी, असंख्य ग्रंथालयांनी मोबाईल ॲप्लिकेशन्स विकसित करुन भारतीय ज्ञान प्रणालींचा प्रसार आणि जतन करण्यात तसेच त्यांचे जतन करण्याच्या प्रयत्नांमध्ये ग्रंथालय महत्त्वाची भूमिका बजावत  आहेत.

**ग्रंथालयांसमोरील आव्हाने :**

**आर्थिक अभाव** : असंख्य ग्रंथालयांना जतन आणि डिजिटायझेशन उपक्रमांना निधी देण्यात अडचण येते.

**भाषेतील अडथळे** : प्रवेशयोग्यता आव्हानात्मक आहे कारण बहुतेक प्राचीन कामे संस्कृत किंवा प्रादेशिक भाषांमध्ये आहेत तेच भारतीय ज्ञान प्रणाली बद्दल सार्वजनिक ज्ञानाचा अभाव आहे, ज्यामुळे संसाधनांचा अपुरा वापर होतो.

**कॉपीराइट** : पारंपारिक ज्ञानाच्या डिजिटायझेशन आणि प्रसारावरील मर्यादांमुळे प्रवेशयोग्यता अडथळा ठरते त्याच प्रमाणे काही ग्रंथालयांमध्ये माहितीच्या डिजिटायझेशन आणि प्रसारासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसतात.

**निष्कर्ष :**

भारतीय ज्ञान प्रणाली ग्रंथालयांशिवाय विकसित, प्रोत्साहित किंवा जतन केली जाऊ शकत नाही. तत्रज्ञानातील बदलांशी जुळवून घेऊन आणि सध्यांच्या समस्यांना तोंड देऊन भारताचा बौध्दिक वारसा जपण्यासाठी ग्रंथालये आश्यक राहू शकतात. धोरणात्मक उपक्रम आणि सहकार्याव्दारे भारतीय ज्ञान प्रणाली जागतिक ज्ञानाचा एक महत्वाचा आणि आवश्यक घटक आहे याची खात्री करण्यासाठी ग्रंथालयांचे महत्वपुर्ण योगदान आहे.

**संदर्भ :**


- Mali, Tanaji and Deshmukh, Rahul(2025).Role Of Library In Preservation Of Indian KnowledgeSystem.10.1729/Journal.44666.https://www.researchgate.net/publication/390873628_Role_Of_Library_In_Preservation_Of_Indian_Knowledge_System/citation/download
- Anasane M.B. and Dhoke, Pllavi (2025). Role of Libraries in Promotion of Indian knowledge system. In A. M. Dodamani & B. Ramesha (Eds.), Reimagining LIS Education : Integrating Indina Knowledge Systems with NEP 2020 (pp. 105-108). Taran Pub.
- Singh, Sushil & Sharma, Hemant. (2024). Contribution of Libraries in The Promotion and Development of Indian Knowledge System. https://www.researchgate.net/publication/384065954_Contribution_of_Libraries_in_The_Promotion_and_Development_of_Indian_Knowledge_System
- Mandavkar, Pavan . (2023). Indian Knowledge System (IKS). SSRN Electronic Journal, 10.2139/ssrn.4589986
- Bhandarkar Oriental Research Institute. (2023). Workshops and Events. Retrieved from Bhandarkar Institute. https://bori.ac.in/academics/infosys-published-books/
- National Mission for Manuscripts. (2023). About Us. Retrieved from NationalMission for Manuscripts. https://www.namami.gov.in/about-us-0
- Morgan, R., Meldrum, K., Bryan, S., Mathiesen, B., Yakob, N., Esa, N., & Ziden, A.

A. (2017). Embedding digital literacies in curricula: Australian and Malaysian experiences. In G. B. Teh & S. C. Choy (Eds.), *Empowering 21st century learners through holistic and enterprising learning: Selected papers from Tunku Abdul Rahman University College International Conference 2016* (pp. 11-19). Springer. https://doi.org/10.1007/978-981-10-4241-6_2